**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 07/10/2020 Accepted on : 19/10/2020 Publication Date: 31/10/2020

# स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीची चळवळ : एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. एस. के. खडसे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर,, जिल्हा. सांगली. (महाराष्ट्र )

**सारांश:** स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची चळवळ तेवढीच जुनी आहे, जेवढी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ !! पण या स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीच्या चळवळीने कधी पाहिजे तेवढा जोर धरलेला दिसत नाही हे या चळवळीचे अपयश आहे. खरं तर विदर्भ राज्याच्या निर्मितीची चळवळ खऱ्या अर्थाने वाढली पाहिजेत, उसळी पाहिजे मात्र असे होताना दिसून येत नाही. कधीतरी विधानसभा अधिवेशन व विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या की स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी चळवळीची आंदोलने सुरू होतात आणि विधानसभेच्या निवडणुका व अधिवेशन झाले कि सर्व कार्यकर्ते आपल्या राजकीय पक्षात सत्तेसाठी जोमाने कार्य करीत असतात. विदर्भ राज्य निर्मितीच्या चळवळीतील कार्यकर्ते स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीपेक्षा पक्षाची सत्ता आणि मिळणारे पद याला जास्त महत्व देतात. या स्वतंत्र विदर्भ राज्य समितीने ग्रामीण भागातील शेतकरी, मुस्लीम, दलित,आदिवासी व इतर बहुजनांना एकत्र करून त्यांच्या समस्या शोधून त्या विदर्भ स्वतंत्र राज्य निर्माण झाल्याशिवाय सुटणार नाही असा प्रचार व प्रसाराचा उपक्रम चालू करून वरील सर्व विदर्भातील नागरिकांना सहभागी करून विदर्भ राज्य महाचळवळ उभी केली पाहिजे. त्यासाठी विदर्भातील प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा पातळीवर विदर्भ राज्यनिर्मिती प्रबोधन आणि जागृतीसाठी कार्यक्रम लावून राष्ट्रीय पक्षाच्या सर्व प्रकारच्या या कार्यक्रमावर, अधिवेशनावर, सभा संमेलनावर आणि निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्धार करायला पाहिजेत. त्याशिवाय राजकीय पक्ष निपक्षपातीपणे स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला एकमताने पाठिंबा देणार नाहीत

विदर्भ प्रदेशातील जनतेच्या, शेतकऱ्यांच्या, व्यवसायिकांच्या, बेरोजगारांच्या, गरीब, दलित, मुस्लीम, ओबीसी आणि भटक्याजाती जमातींच्या लोकांच्या गरजा व समस्या प्रामाणिकपणे प्रयत्न करून सोडवल्या तर विदर्भ राज्य भारतामध्ये आधुनिक, संपन्न व सधन राज्य म्हणून नावारूपाला येईल. मात्र त्यासाठी गरज आहे राजकीय इच्छाशक्तीची !!!! राजकीय इच्छाशक्ती प्रामाणिक व निपक्षपाती, जातीविरहित आणि निधर्मी असली पाहिजे तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये काँग्रेस व इतर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी 'संयुक्त महाराष्ट्र एकच ध्यास बाकी प्रश्न खल्लास'!! असा ठाम निर्धार करून विदर्भातील काँग्रेस, भाजप,शिवसेना,राष्ट्रवादी,बसपा, रिपाई ,शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी संघटना यांनी आपले पक्षीय मतभेद व हितसंबंध बाजूला ठेवून तसेच आपल्या राजकीय पक्षाला दूर ठेवून जर प्रामाणिकपणे 'स्वतंत्र विदर्भ राज्य एकच ध्यास बाकी सर्व प्रश्न खल्लाश'!! असे मनात ठाम बांधले, या विदर्भ राज्य चळवळीत सहभाग प्रामाणिकपणे घेतला आणि विधिमंडळ व संसदेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला तर नक्कीच स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे जनतेचा रेटा निर्माण झाला आणि सर्व राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळाला तर नक्कीच विधिमंडळ आणि संसद बहुमताने विदर्भ राज्य निर्माण करेल यात कोणतीही शंका नाही.

**शब्दकुंजी: (कि वर्ड):-**
1.संयुक्त महाराष्ट्र : मध्यप्रांत, मुंबईराज्य आणि हैदराबाद राज्यातील मराठी भाषिकांचे मुंबई सहित राज्य होय.
2.बेरार प्रांत : बेरार हा मध्यप्रांतातील/मध्यप्रदेशातील मराठी भाषिक प्रदेश.
3.वऱ्हाड प्रांत : हा मध्यप्रांत/मध्यप्रदेश व हैदराबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेश.
3.उर्वरित महाराष्ट्र : विदर्भ, मराठवाडा, कोकण, सोडून महाराष्ट्राचा उर्वरित विकसित भाग/प्रदेश.
4.विदर्भीय/विदर्भवादी : स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी उभ्या केलेल्या चळवळीचे कट्टर समर्थक.
५.मध्यप्रांत : आताचे हिंदी भाषिक मध्यप्रदेश राज्य
६.हैद्राबाद राज्य: निझाम राजवटीचे उर्दुभाषिक/ तेलगु राज्य म्हणजे आताचे आंध्रप्रदेश व तेलंगना राज्य.

## १ प्रस्तावना :

स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची चळवळ तेवढीच जुनी आहे जेवढी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ !! पण या स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीच्या चळवळीने कधी पाहिजे तेवढा जोर धरलेला दिसत नाही हे या चळवळीचे अपयश आहे. खरं तर विदर्भ राज्याच्या निर्मितीची चळवळ खऱ्या अर्थाने वाढली पाहिजेत, उसळी पाहिजे मात्र असे होताना दिसून येत नाही. कधीतरी विधानसभा अधिवेशन व विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या की स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी चळवळीची आंदोलने सुरू होतात आणि विधानसभेच्या निवडणुका व अधिवेशन झाले कि सर्व कार्यकर्ते आपल्या राजकीय पक्षात सत्तेसाठी जोमाने कार्य करीत असतात. विदर्भ राज्य निर्मितीच्या चळवळीतील कार्यकर्ते स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीपेक्षा पक्षाची सत्ता आणि मिळणारे पद याला जास्त महत्व देतात. या स्वतंत्र विदर्भ राज्य समितीने ग्रामीण भागातील शेतकरी, मुस्लीम, दलित,आदिवासी व इतर बहुजनांना एकत्र करून त्यांच्या समस्या शोधून त्या विदर्भ स्वतंत्र राज्य निर्माण झाल्याशिवाय सुटणार नाही असा प्रचार व प्रसाराचा उपक्रम चालू करून वरील सर्व विदर्भातील नागरिकांना सहभागी करून विदर्भ राज्य महाचळवळ उभी केली पाहिजे. त्यासाठी विदर्भातील प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा पातळीवर विदर्भ राज्यनिर्मिती प्रबोधन आणि जागृतीसाठी कार्यक्रम लावून राष्ट्रीय पक्षाच्या सर्व प्रकारच्या या कार्यक्रमावर, अधिवेशनावर, सभा संमेलनावर आणि निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्धार करायला पाहिजेत त्याशिवाय राजकीय पक्ष निपक्षपातीपणे स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला एकमताने पाठिंबा देणार नाहीत.

भारतामध्ये नुकतीच आंध्रप्रदेशातून तेलंगणाची तेलंगण राज्याची निर्मिती झाली. यापूर्वी उत्तर प्रदेशातून उत्तरांचल राज्यांची, मध्यप्रदेश मधून छत्तीसगड राज्याची, बिहार मधून झारखंड राज्याची निर्मिती झाली आहे. त्यामुळे आता असाममधून बोडोलँड, बंगालमधून गोरखालँड आणि उत्तर प्रदेशमधून सुद्धा आणखी काही प्रदेशाची स्वतंत्र राज्याची मागणी पुढे येते आहे. त्यातच महाराष्ट्रातून या मागास राहिलेल्या विदर्भाची स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठीची चळवळ जोर धरत आहे.

विदर्भ राज्याच्या मागणीसाठी प्रामुख्याने त्र्य.गो. देशमुख, आचार्य दांडेकर, मा.वसंत साठे, मा.एन. पी. के. साळवी, शंकरराव गेडाम, जांबुतराव धोटे, नानाभाऊ एंबडवार, भगवंतराव गायकवाड, मा.रणजित देशमुख, मधुकर किंमतकर, दत्ता मेघे, मा.हरिभाऊ केदार आदी मान्यवर नेत्यांनी आंदोलने करून विदर्भ राज्य निर्मितीची चळवळ चालवली आहे.

खरं तर स्वतंत्र विदर्भाची मागणी सर्वात अगोदर मा. दादासाहेब खापर्डे यांनी केली होती आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी लोकनायक बापूजी अणे आणि ब्रिजलाल बियाणी यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी केली होती.[१] मात्र संयुक्त महाराष्ट्र समितीने विदर्भाच्या न्याय्य मागणीसाठी 'अकोला करार' आणि 'नागपूर करार' करून विदर्भातील मराठी भाषिकांना न्याय देण्याचे मान्य केले मात्र नागपूर करारातील अटीचे पालन पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाने आणि सत्ताधारी पक्षाने केले नाही. आज गेल्या पन्नास ते साठ वर्षापासून विदर्भातील विकासाचा अनुशेष राहिल्यामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भाचा फारसा विकास झालेला नाही. त्यामुळेच विदर्भातील लोकांनी स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी चळवळ उभी केली आहे.

## २ संशोधनाची साधने :-

सदर संशोधन पेपर लिहिण्यासाठी व तथ्य संकलनासाठी संदर्भ पुस्तके, मासिके, अहवाल, विविध वर्तमानपत्रातील लेख, दैनिक वर्तमानपत्र इत्यादी दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

## ३ संशोधन पद्धती :-

सदर संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व ग्रंथालयीन आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

**संशोधन उद्देश :**

- विदर्भ राज्याच्या चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.
  नागपूर कराराची मुद्दे करारातील मुद्दे व अटी यांचा अभ्यास करणे.
- स्वतंत्र विदर्भ राज्याच्या चळवळीची दिशा व भवितव्याचे आकलन करणे.

## ४ विषय विवेचन :

### स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीची पार्श्वभूमी:-

विदर्भ हा महाराष्ट्राचा असणारा ईशान्य प्रदेश असून या विदर्भ प्रदेशात सध्या नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि वाशिम हे अकरा जिल्हे आहेत विदर्भाचा प्रदेश महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी 31.6 टक्के तर महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्या 21.3 टक्के आणि पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत आर्थिक विकास खूप कमी असून हा प्रदेश पांढऱ्या सोन्याचा प्रदेश ही प्रामुख्याने विदर्भाची ओळख आहे. या विदर्भामध्ये प्रामुख्याने कापूस, सोयाबीन, ज्वारी,हायब्रीड, उडीद, तूर आणि तांदूळही पिके प्रमुख्ने घेतली जातात. विदर्भ हा शब्द वीर+तर्फ म्हणजे वीर आणि तर्फ भूमी, प्रदेश. त्यामुळे विर आणि तर्फ या शब्दाचा अपभ्रंश होऊन वीर+दर्भ म्हणजे विदर्भ असा झाला. म्हणजे भारताच्या इतिहासातील सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, यादव इत्यादी राजवटीतील वीर पुत्राची भूमी म्हणजे विदर्भ[2]. सन 1853 मध्ये पर्यंत अमरावती आणि आसपासचा प्रदेश वऱ्हाड पूर्वी वाकाटक, राष्ट्रकूट, सातवाहन आणि यादव या राजवटीमध्ये होता. पुढे ह्या प्रदेशावर भोसले घराण्याची सत्ता होती आणि नागपूर ही भोसले घराण्याची राजधानी होती. भोसले नंतर निजाम राजवट आली आणि निजामशाहीनंतर ब्रिटिश राजवटीकडे हा प्रदेश गेला पूर्वी वऱ्हाड प्रांताला बेरार प्रांत म्हणून ओळखले जायचे. 1903 मध्ये वऱ्हाड म्हणजे बेरार हा प्रदेश ब्रिटिशांनी मध्यप्रांताला जोडला आणि 1947 नंतर बेरार, वऱ्हाड आणि मध्यप्रांत हे मध्यप्रदेश म्हणून नवीन घटकराज्य निर्माण केले. सन 1956 मध्ये मराठी भाषिक प्रदेशाच्या एकीकरणासाठी हा प्रदेश मुंबई राज्यात सहभागी झाला आणि 1 मे 1960 रोजी महाद्वीभाषिक मुंबई राज्यातून मराठी भाषिकांचे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाले[3]. यामध्ये अकोला करार नागपूर करार करून काही अटीवर विदर्भ (बेरार व वऱ्हाड) हा प्रदेश सहभागी झाला.

### महाराष्ट्र एकीकरण आणि महाविदर्भ राज्याची मागणी :-

महाविदर्भ सभेच्या स्थापनेच्या वेळी सर्वानुमते एक विस्तृत ठराव पास करण्यात आला. या महाविदर्भ सभेच्या उद्दिष्टांमध्ये महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीत वेळोवेळी सहाय्य करणे हे उद्दिष्ट अंतर्भूत करण्यात आले होते. स्वतः बॅ. रामराव देशमुख यांनीही वेगळ्या विदर्भाच्या मागणीचे वर्णन 'महाराष्ट्र एकीकरणाची पहिली पायरी' असे त्यावेळी केले होते. हे सर्व जरी खरे असले तरी महाविदर्भ सभेच्या सर्व कार्यकर्त्यांना आणि पुढाऱ्यांना सर्व मराठी भाषिकांचा एक प्रांत व्हावा हे अभिप्रेत होते असे म्हणता येणार नाही. हिंदी भाषिक मध्यप्रांतातून विदर्भाचा वेगळा प्रांत होऊ द्यावा, पुढचे पुढे पाहू अशीच अनेकांची त्यावेळी मनस्थिती होती[4].

महाविदर्भ सभेचे दुसरे अधिवेशन दिनांक 3 ऑक्टोबर 1943 ला अमरावती येथे भरले व बॅरिस्टर जयकर हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते त्यांना महाविदर्भाची मागणी करणाऱ्यांच्या मनोगताची जाणीव असावी असे दिसते. मराठी भाषिक महाविदर्भ संपूर्ण मराठी भाषिकांच्या संभाव्य प्रदेशात सामील व्हावा हे त्यांना अभिप्रेत होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, 'आपल्या या महाविदर्भाच्या मागणीची यश, अखिल मराठी भाषिक प्रदेशाच्या एकीकरणाची जी विशाल मागणी आहे, तिचा पहिला हप्ता म्हणून महाविदर्भाची मागणी करणाऱ्यावरच बहुतांशी अवलंबून आहे. या संदर्भातच महाविदर्भाची मागणी करण्याला अर्थ आहे'. वरील भाषणातील प्रत्येक शब्दाचा अर्थ ध्यानात घेतला तर महा विदर्भाच्या वेगळ्या राज्याची उद्दिष्ट बाजूला ठेवून एकिकृत महाराष्ट्रात सामील होण्याबाबत महाविदर्भातील जनतेच्या आणि नेत्यांच्या मनात संशय आणि पूर्वग्रह होते आणि काही लोक तरी विदर्भाची वेगळी संस्कृती आणि राजकीय दर्जा यासंबंधी विशेष आग्रही होते हे स्पष्ट होते[5]. पुढे लोकनायक बापूजी अणे यांनी वेगळ्या विदर्भाच्या मागणीचे निवेदन राज्य पुनर्रचना आयोगाला दिले त्यात या संशयाची व पूर्वग्रहाची तसेच विदर्भाच्या संस्कृतीच्या वेगळेपणाचे प्रतिबिंब पडलेले आहे.

### अकोला करार (8 ऑगस्ट 1947) :-

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 07/10/2020 Accepted on : 19/10/2020 Publication Date: 31/10/2020

दार कमिशनपुढे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्याची एकमुखी मागणी करता यावी यासाठी अकोला येथे निवडक कार्यकर्त्यांची एक बैठक झाली. स्वतंत्र संयुक्त महाराष्ट्र म्हणून एक प्रांत असावा आणि त्यामध्ये वऱ्हाडमधील मराठी भाषिकांचा प्रदेश व महाराष्ट्र असे दोन उपप्रांत असावेत या मागणीला मान्यता द्यावी म्हणून अकोला करार करण्यात आला. या करारावर शंकरराव देव द.वा पोतदार, कन्नमवार, बापुजी आणे, शेषराव वानखेडे, धनंजयराव गाडगीळ, पुनमचंद रांका, श्रीमन्नारायण अगरवाल, ब्रिजलाल बियाणी, माडखोलकर, गोपाळराव खेडकर, रामराव देशमुख इत्यादी मान्यवर नेत्यांनी सह्या केल्या होत्या. अकोला कराराप्रमाणे जर संयुक्त महाराष्ट्र निर्माण करणे अशक्य असेल तर महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातील. असा दुसरा ठरावही मंजूर करण्यात आला, दरम्याने दार कमिशनने एक प्रश्नमालिका तयार करून महाराष्ट्राच्या नेत्यासमोर ठेवली. त्यामध्ये मुंबई शहर महाराष्ट्रापासून अलग ठेवण्याची कल्पना मांडली होती. 10 डिसेंबर 1948 रोजी कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला, भाषावार प्रांतरचना बनवण्याच्या धोरणाशी दार समितीच्या शिफारशी पूर्णपणे विसंगत होत्या. त्यामुळे भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांचा फार मोठा अपेक्षाभंग झाला[6].

## जेव्हीपी समिती:-

भाषावार प्रांतरचना निर्माण करण्यासाठी 1949 मध्ये जेव्हीपी समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल 5 एप्रिल 1949 रोजी केंद्र सरकारला सादर केला. त्यामध्ये स्पष्टपणे अशी शिफारस केली होती की मराठी भाषिकांना महाराष्ट्र प्रांत पाहिजेच असेल तर यथावकाश होईल, परंतु त्यात मुंबईचा समावेश होणार नाही आणि विशेषता विदर्भाच्या स्वतंत्र राज्याच्या मागणी संदर्भात एकट्या वऱ्हाड प्रदेशाचा स्वतंत्र विदर्भ प्रांत निर्माण होणार नाही अशी शिफारस केली होती. त्यामुळे स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण होणार नाही ही काळया दगडावरची रेष त्या काळी निर्माण झाली होती. तरीही विदर्भवादी नेत्याने स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी पुढेही अशीच चालू ठेवलेली दिसून येते.

## संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि नागपूर करार :-

संयुक्त महाराष्ट्रामध्ये समाविष्ट होणाऱ्या मराठी भाषिक प्रदेशांना समान दर्जा देणारा, सर्वांचा समान विकास करणारा आणि सर्व मराठी भाषिक प्रदेशांना न्याय देणारा एखादा सर्वानुमते करार करावा या उद्देशाने विदर्भ प्रांत, संयुक्त महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागातील प्रमुख नेते व कार्यकर्ते नागपूर येथे एकत्र आले आणि नागपूर करार करण्यात आला[7].

नागपूर करारातील प्रमुख कलमे अटी पुढील प्रमाणे.

1.सध्याची मुंबई राज्य, मध्यप्रांत आणि हैदराबाद राज्यातील सर्व मराठी भाषिक प्रदेश यांचे मिळून नवीन राज्य बनविण्यात यावे, या नव्या राज्याला महाराष्ट्र हे नाव द्यावे आणि मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी असावी.

2.सर्व प्रकारचे विकास कार्य व प्रशासन यासाठी या राज्याचे महाविदर्भ, मराठवाडा व उर्वरित भाग असे तीन भाग पाडण्यात येतील.

3.या तीनही विभागांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या आर्थिक संसाधनाचे व साधनसंपत्तीचे वितरण केले जाईल, मराठवाडा ह्या अविकसित भागाकडे अधिक लक्ष देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यासंबंधीचा अहवाल दरवर्षी विधिमंडळासमोर ठेवण्यात येईल.

4. शासनाच्या विविध विभागामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व व स्थान देण्यात येईल.

5. लोकसंख्येच्या प्रमाणात या तिन्ही विभागातील लोकांसाठी व्यवसायिक, तांत्रिक, वैद्यकीय आणि विशेष प्रकारचे शिक्षण देणाऱ्या संस्थेत प्रवेश व राखीव जागा ठेवण्यात येतील.

6.महाराष्ट्रात उच्च न्यायालय मुंबईला असेल तर दुसरे उच्च न्यायालयाचे खंडपीठ विदर्भासाठी नागपूर आणि मराठवाड्यासाठी औरंगाबाद येथे स्थापन करण्यात येईल.

7. शासकीय नोकऱ्या किंवा शासकीय नियंत्रणाखालील व्यवसायात किंवा मंडळातील प्रशासनात सनदी नोकरांची भरती करताना प्रत्येक विभागातून लोकसंख्येच्या प्रमाणात भरती करण्यात येईल.

8. शासन आणि जनता त्यांचे परस्पर संबंध सलोख्याचे आणि सहकार्याचे होण्यासाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर देण्यात येईल.

9. मुंबई महाराष्ट्राची राजधानी असेल तर नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असेल तेथे शासकीय कचेऱ्या एका निश्चित काळासाठी हलविल्या जातील आणि वर्षातून किमान एक अधिवेशन नागपूरला भरण्यात येईल या अधिवेशनामध्ये विदर्भातील सर्व प्रश्न व समस्या यावर चर्चा करण्यात येईल सध्या हे हिवाळी अधिवेशन म्हणून ओळखलं जाते.

अशाप्रकारे काही अटीमान्य करून विदर्भाला संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न झाले.

यानंतर दुसरीकडे न्यायमूर्ती फाजल अली कमिशन याने 10 ऑक्टोबर 1955 रोजी आपल्या कामकाजाचा अहवाल केंद्र सरकारला सादर केला. या कमिशनने विदर्भाचे वेगळे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात येईल असे सुचवले, त्यामुळे विदर्भातील विदर्भवादी नेत्यांना वराड प्रांत म्हणजे स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण व्हावे असे वाटत होते तशी स्वतंत्र विदर्भाची मागणी फार जुनी आहे.

नागपूर करारातील आर्थिक संसाधनाचे व साधनसंपत्तीचे लोकसंख्येच्या प्रमाणात वितरण केले जाईल असे म्हटले, मात्र आर्थिक संसाधनाचे केंद्रीकरण प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्राकडे होत असल्याने विदर्भाचा आर्थिक विकास खुंटलेला आहे असे विदर्भवाद्यांचे ठाम मत आहे. तसेच राज्याच्या शासकीय सेवेत प्रशासनात आणि व्यवसायात सुद्धा लोकसंख्येच्या प्रमाणात भरती होत नसल्याने विदर्भातील बेरोजगारांचे प्रमाण वाढले आहे, असेही विदर्भवादी नेत्यांना वाटत वाटते तसेच महाराष्ट्रातील उद्योगधंदे, व्यवसाय संस्था, शिक्षण संस्था, वैद्यकीय संस्था, अभियांत्रिकी संस्था आणि सूतगिरण्या इत्यादी प्रमुख संस्था पश्चिम महाराष्ट्रातच मोठ्या प्रमाणात निर्माण होत असल्याने पश्चिम महाराष्ट्राचा सर्व प्रकारचा विकास होत आहे आणि विदर्भ मात्र औद्योगिक, शिक्षण, व्यवसायिक क्षेत्रांमध्ये मागास राहिलेला आहे. नागपूर अधिवेशनात विदर्भातील प्रश्न व समस्यावर चर्चा करणे व उपाय सुचवणे असे नागपूर करारात मान्य केले असून सुद्धा तसे होताना दिसून येत नाही, या उलट विदर्भातील अधिवेशनाचा काळ कमी करण्यावर सरकार गेल्या 50 ते 60 वर्षांपासून भर देतानं दिसत आहे. विदर्भाच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भाच्या समस्याकडे आणि विकासाचा अनुशेष याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 07/10/2020 Accepted on : 19/10/2020 Publication Date: 31/10/2020

करीत आहेत. त्यामुळे विदर्भ राज्य निर्माण झाले पाहिजेत अशी मांडणी करून स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी चळवळ उभी केली जात आहे. त्यासाठी सोशल मीडियाचा वापर करून चळवळीचा विस्तार युवक आणि युवकांमध्ये वाढविला जात आहे.

## स्वतंत्र विदर्भ राज्य पुढील समस्या व आव्हाने :-

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपासून स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची चळवळ सुप्तावस्थेत चालूच होती कारण नागपूर करारातील अटीचे पालन पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी आणि विशेषता सत्ताधारी काँग्रेस पक्षाने नंतरच्या कालावधीमध्ये भाजप-शिवसेना यांनीही केले नाही. त्यामुळे विदर्भवादी नेत्याने आता वेगवेगळ्या 40 संघटनांना एकत्र करून विदर्भ राज्य निर्मितीची स्वतंत्र चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सध्या या स्वतंत्र विदर्भ चळवळीचे नेतृत्व अॅड. वामनराव चटप करीत आहेत. त्यांनी 4. जुलै 2018 रोजी ‘नागपूर बंद’ची घोषणा करून राजकीय पक्षांसह इतर विदर्भवादी पक्षांना व संघटनाही या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते[8].

विदर्भ राज्य निर्मिती समोरील समस्या व आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.
1.काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेना या राजकीय पक्षाचा संयुक्त महाराष्ट्रालाच समर्थन आहे मात्र याउलट स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीस त्यांचा पाठिंबा प्रामाणिकपणे दिसून येत नाही हेही आह्वान उभे आहे .
2. विदर्भातील काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेना या राजकीय पक्षाचे नेते विदर्भातील स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीच्या सभेत विदर्भ राज्यावर अन्याय झाला असून आता स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण झालेच पाहिजेत अशा सिंहगर्जना करणारे मात्र मुंबईत आल्यावर ते विधिमंडळात पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांसमोर मुग गिळून बसतात. त्यामुळे विदर्भ राज्याच्या चळवळीसमोर विदर्भातील राजकीय नेते हे देखील आव्हान आहे.
3.विदर्भामध्ये निवडणुकीत काँग्रेस, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या प्रमुख राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला निवडून न देता विदर्भ निर्माण महासंघाच्या कार्यकर्त्यांला निवडून द्या अशी घोषणा करून सुद्धा विदर्भातील लोकांनी काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेना या पक्षाला निवडणुकीत मते देऊन त्यांचे उमेदवार निवडून आणले आहेत त्यामुळे विदर्भातील जनतेचा पाठिंबा मिळविणे विदर्भ राज्य निर्मिती चळवळीसमोर फार मोठे आव्हान आहे.
4. या विदर्भ राज्य चळवळीतील आणि राजकीय पक्षातील अनेक कार्यकर्ते पुणे, मुंबईला बंगला घेऊन राहत आहेत त्यामुळे ही चळवळ स्वतंत्र विदर्भ राज्य काय करणार... हे ही आव्हन या चळवळीसमोर आहे.
5.स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीसाठी आंध्रप्रदेशातील तेलंगण राज्याच्या मागणीसाठी उभारलेल्या चळवळीला पूर्णपणे झोकून देणारे के. चंद्रशेखर राव यांच्यासारखे तरुण, कर्तबगार, प्रभावी नेतृत्व मिळाले पाहिजेत मात्र हे नेतृत्व उभे करण्याची क्षमता भाजप राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना नेत्यांमध्ये नाही[9]. हे ही आव्हान या चळवळीसमोर आहे.
5. स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी लोकचळवळ उभी करणे म्हणजे जनआंदोलन उभे करून ही चळवळ मजबूत करणे मात्र विदर्भामध्ये मराठी भाषिक आणि बहुतांशी हिंदी भाषिकही आहेत. त्यामुळे मारवाडी व्यवसायिक, व्यापारी हिंदीभाषिक असल्याने त्यांचे या चळवळीला फारसे पाठबळ नाही त्यामुळे हिंदी भाषिक आणि व्यापारीवर्ग या चळवळीला जोडणे हे या स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीसमोर आहे[10].
6.स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीमध्ये ग्रामीण भागातील सर्व जाती-धर्माच्या तरुण-तरुणीला जोडणे आवश्यक आहे. कारण जोपर्यंत ग्रामीण भागातून सर्व जाती-धर्माच्या जनतेचा संपूर्ण पाठिंबा मिळत नाही, तोपर्यंत ही चळवळ मोठी होणार नाही आणि सरकारच्या निर्णय प्रक्रियेवर प्रभाव पडणार नाही हे ही या स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीसमोर आहे.
7. स्वतंत्र विदर्भ राज्याची चळवळ वाढवण्यासाठीआणि तीचा प्रचार प्रसार करण्यासाठी आणि या संदर्भात साहित्य निर्माण करण्यासाठी गाव, तालुका, जिल्हा पातळीवर चळवळीची संपर्क कार्यालय सुरू करणे आवश्यक आहे यासाठी पुरेसा निधी उभा करणे हे आवश्यक आहे. त्यामुळे ही चळवळ उभी करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी पुरेसा निधी आवश्यकआहे. मात्र या चळवळीसमोर अपुरा निधी हे फार मोठे आव्हान आहे.

## ५ निष्कर्ष व शिफारशी :-

## स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळ व्यापक करण्यासाठी उपाय योजना व शिफारशी :-

1. विदर्भातील सर्व राजकीय पक्षाच्या नेत्याकडून निवडणुकीमध्ये विदर्भ राज्य निर्मितीस पाठिंबा व विधानसभेत आणि राज्यसभेत या मागणीसाठी आवाज उठविण्याचे त्यांच्याकडून लेखी देखील घ्यावे.
2. या स्वतंत्र विदर्भ चळवळीचे नेतृत्व तरुण, कर्तबगार, प्रभावी, विदर्भाविषयी निष्ठा आणि निस्वार्थी असणाऱ्या प्रमाणिक नेत्याकडे द्यावे.
3. विदर्भ राज्य निर्मितीसाठी शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागांमध्ये आणि आदिवासी, दलित, मुस्लिम, मराठा, ओबीसी, भटक्या जाती जमाती आणि हिंदी भाषिक, सावकार, मारवाडी तसेच सर्व व्यवसायिक, शेतकरी,महिला आणि कामगार या सर्वांना सहभागी करून त्यांच्यावर विशिष्ट जबाबदारी सोपवावी म्हणजे ते चळवळीला जोडले जातील आणि सरकारवर दबाव येईल.आणि या सर्वांच्या सहकार्यातून स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण करण्यासाठी जनरेटा वाढवून लोकचळवळ उभी करता येईल.
4. स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी प्रचार व प्रसार करण्यासाठी वेगवेगळया क्षेत्रातील नामवंत हुशार अभ्यास व्यक्तींची कमिटी करून दैनिक वृत्तपत्रांमध्ये, मासिके, लोकल टिव्ही चॅनल्स, युट्युब चॅनल्स, इतर सोशल मीडियावरून लिखाण करावे तसेच पुस्तकाचे लिखाण करून हे सर्व लिखाण ग्रामीण भागापर्यंत पोहोचवावे या माध्यमातून स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मिती पोषक वातावरण निर्माण होईल आणि स्वतंत्र विदर्भ राज्यनिर्मितीची मागणीची तीव्रता महाराष्ट्र राजकीय नेत्यांच्या आणि राजकीय पक्षांच्या लक्षात येईल.
5. लहान राज्य विकास करीत नाहीत असे म्हटले जाते, मात्र विदर्भ सुपीक प्रदेश आहे. कोळसा व इतर खाणी तसेच पांढऱ्या सोन्याचा असून या प्रदेशात कापूस, सोयाबीन, ज्वारी, तांदूळ, गहू, तूर इत्यादी उत्पादन मुबलक प्रमाणात होते. मात्र या लहान राजाने सुद्धा जर अन्नधान्य व फळ प्रक्रिया उद्योग सुरू केले आणि जर शेतीला पाणी अडवून व्यवस्था जलसिंचनाची सोय केली, आधुनिक तंत्रज्ञानावर शेती करून शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले तर या लहान राज्याचाही सर्व प्रकारचा विकास आताच्यापेक्षाही मोठ्या प्रमाणात होईल. याशिवाय केंद्र सरकारच्या मदतीने आपला विकास घडवून आणणे शक्य होईल.

## ६ सारांश:

विदर्भ प्रदेशातील जनतेच्या शेतकऱ्यांच्या, व्यवसायिकांच्या, बेरोजगारांच्या, गरीब, दलित, मुस्लीम,ओबीसी आणि भटक्याजाती जमातींच्या लोकांच्या गरजा व समस्या प्रामाणिकपणे प्रयत्न करून सोडवल्या तर विदर्भ राज्य भारतामध्ये आधुनिक, संपन्न व सधन राज्य म्हणून नावारूपाला येईल. मात्र त्यासाठी गरज आहे राजकीय इच्छाशक्तीची !!!! राजकीय इच्छाशक्ती प्रामाणिक व निपक्षपाती, जातीविरहित आणि निधर्मी असली पाहिजे तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये काँग्रेस व इतर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी 'संयुक्त महाराष्ट्र एकच ध्यास बाकी प्रश्न खल्लास'!! असा ठाम निर्धार करून आपल्या राजकीय पक्षाकडे दुर्लक्ष केले.[11] त्याचप्रमाणे विदर्भातील काँग्रेस, भाजप,शिवसेना,राष्ट्रवादी,बसपा, रिपाई ,शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी संघटना यांनी आपले पक्षीय मतभेद व हितसंबंध बाजूला ठेवून तसेच आपल्या राजकीय पक्षाला दूर ठेवून जर प्रामाणिकपणे 'स्वतंत्र विदर्भ राज्य एकच ध्यास बाकी सर्व प्रश्न खल्लाश'!! असे मनात ठाम बांधले, या विदर्भ राज्य चळवळीत सहभाग प्रामाणिकपणे घेतला आणि विधिमंडळ व संसदेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला तर नक्कीच स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही कारण 'स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी ही न्याय्य मागणी आहे'. त्यामुळे जनतेचा रेटा निर्माण झाला आणि सर्व राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळाला तर नक्कीच विधिमंडळ आणि संसद बहुमताने विदर्भ राज्य निर्माण करेल यात कोणतीही शंका नाही.

## संदर्भ :

1. मनियार समीर. 'स्वतंत्र विदर्भ तूर्त अशक्य', महाराष्ट्र टाइम्स, मुंबई 6 ऑगस्ट 2013.
2. विकिपीडिया.
3. विश्वकोश.
4. मुळीक आर.जी, 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', सिंधुताई मुलीक प्रकाशन, मिरज.
5. मुळीक आर.जी, 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', सिंधुताई मुलीक प्रकाशन, मिरज.
6. पाटील बी. बी, 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन,कोल्हापूर.
7. पाटील बी. बी, 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन,कोल्हापूर.
8.विदर्भ राज्य आंदोलन समिती 'प्रेस नोट' नागपूर दिनांक 28 नोव्हेंबर 2018.
9. बर्दापूरकर प्रवीण, 'स्वतंत्र विदर्भाची मागणी अव्यवहार्यच' दैनिक लोकसत्ता, दि. 13 जानेवारी 2016.
10. ॲड. रामटेके एम.डी, 'स्वतंत्र विदर्भ चळवळीला हिंदीचा शॉप' ब्लॉग लेख, दि. 2 ऑक्टोबर 2017.
11. डॉ. खडसे संतोष आणि डॉ. सुनिता बोर्डे 'संयुक्त महाराष्ट्र चळवळीत स्त्रियांचे योगदान' ऐतिहासिक परिप्रेक्षातील स्त्रिया, शुभम प्रकाशन, पुणे.